आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२४ ऑगस्ट २०२५ -रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधिमंडळं ही जनतेचा आवाज पोहोचवण्याचं माध्यम बनायला हवीत, असं केंद्रीय गृहमंत्र्यांच विधिमंडळ पीठासीन अधिकाऱ्यांच्या परिषदेत प्रतिपादन

- महाराष्ट्रात स्मार्ट आणि इंटेलिजंट गाव योजनेच्या पहिल्या टप्प्यात सुमारे साडेतीन हजार गावं स्मार्ट आणि इंटेलिजंट करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

- गेल्या आठवड्यात सर्वच भागांत झालेल्या जोरदार पावसामुळे महाराष्ट्रात धरणांमधला पाणीसाठा ८२ टक्क्यावर

- क्रिकेटपटू चेतेश्वर पुजारा याची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती

**आणि**

- सोळाव्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत ५० मीटर एअर रायफल थ्री पोझिशन प्रकारात भारताच्या ऐश्वर्य प्रताप सिंग तोमरनं पटकावलं सुवर्ण पदक

**<><><><><>**

देशाच्या संसदेची आणि पीठासीन अधिकाऱ्यांची प्रतिष्ठा राखणं महत्वाचं असून, विधिमंडळं ही जनतेचा आवाज पोहोचवण्याचं माध्यम बनायला हवीत, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. देशाच्या केंद्रीय कायदेमंडळाचे पहिले अध्यक्ष म्हणून विठ्ठलभाई पटेल यांनी पदभार स्वीकारल्याच्या घटनेला १०० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्तानं आज नवी दिल्लीत अखिल भारतीय विधिमंडळ पीठासीन अधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय परिषदेचं उदघाटन शहा यांनी केलं, त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले...

**होल्ड बाईट शहा**

स्वातंत्र्यप्राप्तीप्रमाणेच देशाची लोकशाही अबाधित ठेवणं हेही महत्वाचं असून विठ्ठलभाई पटेल यांनी भारतीय संकल्पनांवर आधारित लोकशाहीचा पाया घालण्याचं काम केलं, असं शाह म्हणाले.

यावेळी शाह यांनी विठ्ठलभाई पटेल यांचं जीवन, संसदीय योगदान आणि देशाच्या संसदीय इतिहासावर आधारित प्रदर्शन, तसंच माहितीपटाचं उदघाटन केलं. विठ्ठलभाई पटेल यांच्यावर काढलेल्या विशेष टपाल तिकीटाचं अनावरणही त्यांनी केलं.

**<><><><><>**

नागपूर जिल्ह्यात सातनवरी इथं उभारलेल्या समृद्ध गावाच्या धर्तीवर या योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्याच्या प्रत्येक तालुक्यात १० गावं, याप्रमाणे सुमारे साडेतीन हजार गावं स्मार्ट आणि इंटेलिजंट करण्यात येतील, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केली. प्रायोगिक तत्त्वावर आधुनिक तंत्रज्ञानाधारित सुविधा उपलब्ध असलेल्या सातनवरी गावातून या योजनेचा प्रारंभ फडनवीस यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. आत्मनिर्भर भारताच्या दिशेनं पुढे जात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शेती, आरोग्य, शिक्षण अशा महत्त्वाच्या क्षेत्रांमधल्या १८ सेवा या गावात उपलब्ध करून दिल्याचं फडनवीस यांनी नमूद केलं. या सेवांचा योग्य वापर करून येत्या वर्षभरात सातनवरी गावानं देशातलं सर्वात प्रगतीशील गाव म्हणून नावलौकिक मिळवावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेनं काल दुपारी साडेबारा वाजता ओदिशा किनाऱ्याजवळ आय ए डी डब्लू एस अर्थात एकात्मिक हवाई संरक्षण शस्त्रप्रणालीची पहिली यशस्वी उड्डाण चाचणी केली. या बहुस्तरीय स्वदेशी शस्त्र प्रणालीमध्ये जमिनीतून आकाशात मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली,

कमी पल्ल्याची प्रगत हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली आणि लेसर-आधारित निर्देशित ऊर्जा शस्त्र यांचा समावेश आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आय ए डी डब्लू एस च्या यशस्वी चाचणी बद्दल डी आर डी ओ, सशस्त्र दलं तसंच उद्योग क्षेत्राचं अभिनंदन केलं.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांनी आज संध्याकाळी फिजीचे प्रधानमंत्री सिटीवेनी लिगामामाडा राबुका यांची भेट घेतली. फिजीचे प्रधानमंत्री आजपासून भारताच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर आले आहेत. केंद्रीय शिक्षण राज्य मंत्री सुकांता मजुमदार यांनी आज सकाळी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतील. ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेणार आहेत.

**<><><><><>**

युक्रेननं सोव्हिएत संघाच्या जोखडातून मुक्त होऊन ३४ वर्षे पूर्ण केल्याच्या निमित्तानं जगभरातील नेत्यांनी शुभेच्छा आणि पाठिंब्याचे संदेश पाठवले आहेत.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एका पत्राद्वारे युक्रेनच्या धैर्याचं कौतुक केलं आहे. अमेरिका युक्रेनकडे भविष्यातला एक स्वतंत्र देश म्हणून विश्वास ठेवत आहे, असं त्यांनी म्हटलं आहे. युक्रेनमध्ये रक्तपात थांबवण्यासाठी आणि सार्वभौमत्व टिकवण्यासाठी शांततेच्या मार्गानं वाटाघाटी होणे आवश्यक असल्याचं देखील त्यांनी पत्रात नमूद केलं आहे. कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग, ब्रिटनचे राजा चार्ल्स, तसंच पोप लिओ चौदावे यांनीही युक्रेनला शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

गणेशोत्सवानंतर कृत्रिम तलावातच मूर्तींचं विसर्जन करावं यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेनं यावर्षी २७५ हून अधिक कृत्रिम तलाव उभारले आहेत. महाराष्ट्र शासनानं यंदापासून गणेशोत्सवाला ' राज्य उत्सव' म्हणून घोषित केलं आहे. या

सर्व पार्श्वभूमीवर, हा उत्सव अधिक उत्साहात, नियोजनबद्धपणे, तसंच निसर्गस्नेही पद्धतीनं साजरा करण्यासाठी महापालिका मोठ्या प्रमाणात प्रयत्न करत आहे.

जास्तीत जास्त शाडू मूर्ती घडाव्यात यासाठी मूर्तिकारांना आतापर्यंत तब्बल ९९० टन हून अधिक मोफत शाडू माती वाटप, १ हजार २५ मूर्तिकारांना मंडपासाठी मोफत जागा, मूर्तिकारांना १० हजार ८०० लीटर नैसर्गिक रंग वाटप, सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळांसाठी मंडप उभारणीकरता एक खिडकी योजना, उत्सव काळात घ्यावयाच्या काळजी संदर्भात गणेशोत्सव मंडळांच्या स्वयंसेवकांना आपत्कालीन व्यवस्थापनाचं प्रशिक्षण इत्यादी उपक्रम पालिकेनं राबवले आहेत. उत्सव कालावधीत आवश्यक त्या सर्व नागरी सेवा-सुविधा पुरवण्यासाठी पालिका प्रशासन सज्ज असल्याचं पालिकेनमं कळवलं आहे.

**<><><><><>**

गेल्या आठवड्यात सर्वच भागांत झालेल्या जोरदार पावसामुळे महाराष्ट्रातल्या धरणांमधला पाणीसाठा ८२ टक्क्यांवर पोहोचला असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात १२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. राज्यात मागच्या वर्षी या काळात सुमारे ७० टक्के इतका पाणीसाठा होता. यंदा राज्यातले २० मोठे प्रकल्प १०० टक्के भरले आहेत. नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे आणि कोकण विभागात असलेल्या सर्वच धरणांचा पाणीसाठा सरासरीपेक्षा चांगलाच वाढला आहे. गेल्या वर्षी याच दिवसात या विभागांमधल्या धरणांमध्ये सुमारे ३० टक्के एवढा कमी पाणीसाठा होता. कायमच दुष्काळाच्या छायेत असलेल्या मराठवाड्यातही यंदा ७५ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट संघातील फलंदाज चेतेश्वर पुजारा यानं आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्ती जाहीर केली आहे. क्रिकेटनं मला अमूल्य संधी, अनुभव, ध्येय आणि प्रेम दिलं तसंच माझ्या राज्य आणि देशाचं प्रतिनिधित्व

करण्याची संधी दिली अशा शब्दात पुजारानं समाजमाध्यमावर आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रत्येक चांगल्या गोष्टीला शेवट असतो, निवृत्त होताना माझ्या मनात कृतज्ञतेची भावना आहे, असं पुजारा म्हणाला.

चेतेश्वर पुजारानं १०३ कसोटी क्रिकेट सामन्यात ४३ पूर्णांक ६० च्या सरासरीने ७ हजार १९५ धावा केल्या. यात १९ शतकं आणि ३५ अर्धशतकांचा समावेश आहे.

**<><><><><>**

कझाकस्तानमध्ये सुरू असलेल्या सोळाव्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत भारतीय नेमबाज ऐश्वर्य प्रताप सिंग तोमर याने ५० मीटर एअर रायफल थ्री पोझिशन प्रकारात सुवर्ण पदक जिंकलं आहे. चीनच्या वेन्यू झाओने रौप्य पदक जिंकलं तर जपानच्या नाओया ओकाडाने कांस्यपदक जिंकलं. यापूर्वी याच स्पर्धेच्या ५० मीटर एअर रायफल थ्री पोझिशन प्रकाराच्या सांघिक गटात ऐश्वर्य प्रताप सिंग तोमर, चैन सिंग आणि अखिल शेओरन यांच्या संघानं रौप्य पदक जिंकलं.

**<><><><><>**

पुढच्या वर्षी होणाऱ्या साऊथ आफ्रिका हंगामासाठी प्रिटोरिया कॅपिटल्स संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुली याची नियुक्ती झाली आहे. इंग्लंडचे माजी फलंदाज जोनाथन ट्रॉट यांनी पद सोडल्यानंतर अवघ्या एका दिवसात ही नियुक्ती करण्यात आली आहे. २००८मध्ये व्यावसायिक क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर गांगुली याने बीसीसीआयचं अध्यक्ष म्हणून काम केलं होतं. त्याशिवाय इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धांमध्ये दिल्ली कॅपिटल्स संघाचा संचालक म्हणूनही त्याने काम केलं आहे. सध्या गांगुली बंगाल क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून काम करत आहे.

**<><><><><>**

एस ए एफ एफ हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या १७ वर्षांखालील महिला संघाने भूतानच्या संघाचा ८-० असा पराभव केला आहे. भारतीय संघाचा हा सलग तिसरा विजय आहे. आतापर्यंतच्या तिन्ही सामन्यात भारतीय संघाने तब्बल १७ गोल केले आहेत. त्यामुळे गुणफलकावरही भारत अव्वल स्थानावर आहे. भारताच्या खालोखाल बांगलादेश आणि नेपाळ असून त्यांच्याकडे प्रत्येकी तीन गुण आहेत. भूतानचा संघ अद्याप एकही गुण मिळवू शकलेला नाही.

**<><><><><>**

भारतीय स्टेट बँकेनं रिलायन्स कम्युनिकेशनची खाती बनावट म्हणून घोषित केल्यानंतर आता बँक ऑफ इंडियानंही या कंपनीची कर्ज खाती बनावट म्हणून घोषित केली आहेत. या कंपनीनं कर्जाची रक्कम वळवणं आणि नियमांचं उल्लंघन केल्याचे आरोप बँकेनं केले आहेत.

**//<><><><><>//**